# पदभरती जाहिरात

## चंद्रपुर शहर महानगरपालिका, चंद्रपुर.

## विशेष कंत्राटी पदभरती

जा.क्र. चंशमनपा/आ.वि./३३६/२०२५ दिनांक : २९/०५/२०२५

चंद्रपुर शहर महानगरपालिका, आरोग्य विभागातील राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत एकुण २८ डासोत्पत्तीस्थाने तपासणीस (ब्रिडींग चेकर्स) नेमण्यासाठी खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे कंत्राटी व करारपध्दतीने ३ महिन्यांच्या कालावधी करीता मानधन तत्वावर खालील पदांकरीता विहीत अर्हता पात्र उमेदवारांची गुणांकन पध्दतीने पदभरती घेण्यात येत आहे.

| अ. क्र. | पदनाम | शैक्षणिक अर्हता | वयोमर्यादा | आवश्यक पदे | मानधन प्रति दिवस रु. |
|---|---|---|---|---|---|
| 1. | डासोत्पत्तीस्थाने तपासणीस (ब्रिडींग चेकर्स) | किमान १० वी पास | १८ ते ४३ वर्षे | २८ | ४५०/- |

**सर्वसाधरण अटी व शर्ती :-**

१. विहीत नमुन्यातील अर्जातच परिपुर्ण माहिती भरुन अर्ज व संपुर्ण आवश्यक **मुळ** दस्ताऐवज सोबत झेरॉक्स प्रतिसह आरोग्य विभाग, तिसरा माळा, चंद्रपुर शहर महानगरपालिका, गांधी चौक, चंद्रपुर येथे स्वखर्चाने उपस्थित राहावे.

२. सर्व उमेदवारांनी सोबत जोडलेल्या अर्जाच्या नमुन्यात अर्ज सादर करणे बंधनकारक राहील.

३. अर्जासोबत १) वयाचा पुरावा, २) दहावी पास प्रमाणपत्र व गुणपत्रिका, जोडणे बंधनकारक राहील. ३) १२ वी पास असल्यास प्रमाणपत्र व गुणपत्रिका एवढीच कागदपत्रे सादर करावीत.

४. पात्र उमेदवारांनी त्यांनी त्यांचे स्वतःचे अर्ज दि. ३०/०५/२०२५ ते दि. ०६/०६/२०२५ या कालावधीत (शासकिय सुट्टीचे दिवस वगळता) सकाळी १०.०० ते सायं. ५.०० वाजेपर्यंत चंद्रपुर शहर महानगरपालिका, चंद्रपूर कार्यालयातील आरोग्य विभागात प्रमाणित दाखल्यांसह (अटेस्टेड करुन) स्वतः जमा करणे अनिवार्य राहील. तसेच, अर्ज सादर करतेवेळी सर्व मुळ प्रमाणपत्रे/दाखले सुध्दा पडताळणी करण्याकरीता सोबत ठेवणे अनिवार्य राहील.

५. उमेदवारांची निवड झाल्यास त्यास तात्पुरत्या स्वरुपात नेमणूक देण्यात येणार असुन, त्यांची नेमणुक ही ३ महिन्यांच्या कालावधी पर्यंतच अस्तित्वात राहील. तसेच, आवश्यकते नुसार कामाच्या कालावधी मध्ये वाढ करण्यात येईल. कालावधी वाढविण्याचे संपुर्ण अधिकार हे मा. आयुक्त तथा प्रशासक, चंशमनपा चंद्रपुर यांचेकडे राखुन ठेवले आहे.

६. आपली नेमणूक हि कंत्राटी स्वरुपात ३ महिन्यांच्या कालाधीसाठीच असल्याने आपली नेमणूक आपोआप संपुष्टात येईल. त्यासाठी १ महिन्याची पुर्वसुचना / नोटीस दिली जाणार नाही.

७. डासोत्पत्तीस्थाने तपासणीस (ब्रिडींग चेकर्स), पदावर काम केलेल्या कर्मचा-यांना कोणत्याही परिस्थितीमध्ये आरोग्य कर्मचारी (पुरुष) या पदाच्या भरतीसाठी आवश्यक असणा-या ९० दिवसांच्या कामकाजाचा अनुभव म्हणून हा अनुभव ग्राहय धरला जाणार नाही किंवा या बाबत उमेदवाराने केलेला कोणताही दावा मान्य केला जाणार नाही.

८. पदासमोर नमुद मानधन रु.४५०/- हे प्रति दिवसाचे मानधन असून त्याव्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते देय राहणार नाही.

९. रुपये १०० च्या स्टॅम्प पेपरवर करारपत्र भरुन देणे बंधनकारक राहील.

१०. अर्जदार हा संबंधित पदासाठी शारिरीक व मानसिकदृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदाराविरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

११. सदर रिक्त पदांच्या संख्येत पदस्थापनेच्या ठिकाणामध्ये बदल करण्याचे सर्व अधिकार हे या कार्यालयाचे असुन निवड प्रक्रियेत कोणत्याही क्षणी बदल करण्याचे अधिकार अध्यक्ष निवड समिती मनपा चंद्रपुर यांनी राखुन ठेवलेले आहेत.

१२. पुनर्नियुक्तीबाबत, शासकिय नियमित सेवेत सामावून घेणेबाबत किंवा शासनामार्फत सेवा संरक्षणाबाबत उमेदवारांना कुठलाही दावा करता येणार नाही.

१३. अर्जदार हा चंद्रपुर जिल्हयातील रहिवासी असणे बंधनकारक आहे. अर्जदाराला कंत्राटी कालावधीत त्यांचे सोईनुसार ठिकाण बदलून मिळण्याची मागणी करता येणार नाही. नियुक्ती दिलेल्या उमेदवारांना त्यांना दिलेल्या कार्यक्षेत्रात मुख्यालयी राहून सेवा देणे बंधनकारक राहील.

१४. निवड प्रक्रियेची पध्दत पुढीलप्रमाणे राहील.

| | |
|---|---|
| गुणांकन पध्दती : | १) पदासाठी आवश्यक इयत्ता १० वी पास मधील टक्केवारी. |
| डासोत्पत्तीस्थाने तपासणीस (ब्रिडींग चेकर्स) | २) इयत्ता १० वी पास मधील टक्केवारी एकसारखे/एकसमान आढळून आल्यास, इयत्ता १२ वी पास असलेल्या उमेदवारांची टक्केवारी नुसार त्यांना प्राधान्य. |

१५. अर्जदारांनी आपल्या अर्जावर त्यांचे सध्या सुरु असलेला मोबाईल नंबर व ई-मेल आयडी अचूक नोदवावा. तसेच ते भरतीप्रक्रिया पुर्ण होईपर्यंत सुस्थितीत राहील, याची दक्षता घ्यावी.

१६. अर्ज करण्याच्या शेवटच्या दिनांकास उमेदवाराचे किमान वय १८ वर्षे व कमाल वय ४३ वर्षे राहील.

१७. भरती प्रक्रिये दरम्यान ज्या-ज्या उमेदवारांना बोलविण्यात येईल, त्या-त्या वेळी त्यांना स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल. तसेच सदर उपस्थितीकरीता कोणतेही मानधन अथवा प्रवास खर्च देय राहणार नाही.

१८. भरती प्रक्रिये दरम्यान उमेदवाराने चुकीची माहिति सादर केल्याचे, कोणतीही माहिति दडवून ठेवल्याचे, दबाव तंत्राचा वापर किंवा अनुचित मार्गाचा अवलंब केल्याचे आढळून आल्यास कोणत्याही टप्प्यावर त्याची उमेदवारी/नियुक्ती कोणतीही पुर्वसुचना न देता रद्द करण्यात येईल.

१९. लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र नमुना-अ या प्रपत्रात अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.

२०. भरती प्रक्रियेचे संपुर्ण अधिकार, पदे कमी-जास्त करणे, भरती प्रक्रिया रद्द करणे, अटी व शर्तीमध्ये बदल करणे व आवश्यकतेनुसार पदे घेण्याचे इत्यादी सर्व अधिकार आयुक्त, मनपा चंद्रपुर यांचेकडे राखुन ठेवले आहे.

**महत्वाची सुचना :** पात्र, अपात्र उमेदवारांची यादी चंद्रपुर मनपाच्या संकेतस्थळावर तसेच, आरोग्य विभाग, तिसरा माळा, महानगरपालिका चंद्रपुर येथे उपलब्ध होण्याचा दिनांक १०/०६/२०२५

तसेच निवड, प्रतिक्षा यादी चंद्रपुर मनपाच्या संकेतस्थळावर तसेच, आरोग्य विभाग, तिसरा माळा, महानगरपालिका चंद्रपुर येथे उपलब्ध होण्याचा दिनांक : १२/०६/२०२५

(निवड झालेल्या उमेदवारांना या कार्यालयामार्फत कुठल्याही प्रकारचे भ्रमणध्वनी व्दारे संपर्क करण्यात येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.)

**अतिरीक्त आयुक्त,**
चंद्रपुर शहर महानगरपालिका,
चंद्रपुर.

## राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम या उपक्रमा अंतर्गत विशेष कंत्राटी पदभरतीसाठी अर्जाचा नमूणा

| अर्जदाराने स्वाक्षरीसहीत फोटो चिकटवावा. |
|---|

### डासोत्पत्तीस्थाने तपासणीस (ब्रिडींग चेकर्स) या पदाकरीता अर्ज

प्रति,

**मा. आयुक्त,**
**महानगरपालिका, चंद्रपूर**

संदर्भ :- दैनिक वृत्तपत्र ................................ दिनांक ..................... मधील जाहिरात.

**मा. महोदय,**

जाहिरातीनुसार, मी ...................................... या पदाकरिता अर्ज करीत असून माझा तपशिल खालील प्रमाणे आहे.

१) संपूर्ण नांव : ..........................................................

२) पत्रव्यवहाराचा पत्ता (पिनकोडसह) : ..........................................................

३) दुरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल : ..........................................................

४) जन्मतारिख : अंकात ............... अक्षरात ..................................... दिनांक ........

रोजीचे वय........... वर्षे.

५) महाराष्ट्राचा मूळ रहिवाशी आहे काय होय/नाही

६) विवाहित/अविवाहीत ..........................

७) विवाहित असल्यास लहान कुटूंबाचे प्रमाणपत्र सोबत जोडले आहे काय होय/नाही

(आवश्यक प्रमाणपत्र जोडावे)

**८) अर्जदाराची शैक्षणिक अर्हता**

| अ. क्र | शैक्षणिक अर्हता | उत्तीर्ण होण्याचे वर्ष | परिक्षा मंडळाचे/ विद्यापिठाचे नांव | एकुण गुण | प्राप्त गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

संगणक परीक्षा उत्तीर्ण (एमएससीआयटी) ................. टक्केवारी.

९) अर्जासोबत जोडलेल्या प्रमाणपत्राची यादी (सांक्षाकिंत प्रती जोडाव्यात)

१) ५)
२) ६)
३) ७)
४) ८)

दिनांक :
ठिकाण:

अर्जदाराची स्वाक्षरी

**महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ मधील प्रतिज्ञापत्राचा नमुना-अ**

## प्रतिज्ञापत्र

**(नियम-४ पाहा)**

श्री/श्रीमती/कुमारी.......................................श्री..........................................

यांचा/यांची मुलगा/मुलगी/ पत्नी, वय ............ वर्षे, राहणार...........................................

पुढीलप्रमाणे असे जाहीर करतो/करते की,

१) मी.................................. या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

२) आज रोजी मला ............ (संख्या) इतकी हयात मुले आहेत त्यापैकी दिनांक २८ मार्च २००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या.......... आहे. (असल्यास जन्म दिनांक नमूद करावा.)

३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००६ नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

दिनांक :
ठिकाण:

अर्जदाराची स्वाक्षरी

## प्रतिज्ञापत्र

मी याव्दारे शपथपूर्वक कथन करतो/करते की, अर्जात नमूद केलेली माहिती माझ्या महितीनुसार सत्य आणि बरोबर आहे. त्यातील कोणतीही गोष्ट चुकीची आढळल्यास मला निवड प्रक्रियेतून अपात्र घोषित केले जाईल आणि जर निवड/नेमणुक झाल्यास माझी सेवा कोणतीही पुर्वसूचना दिल्याविना समाप्त केल्या जाईल याची मला जाणीव आहे.

मी याव्दारे कथन करतो/करते की, मला शासकीय सेवेकरिता अपात्र घोषित कलेले नाही, मला फौजदारी गुन्हयात अटक वा शिक्षा झालेली नाही व माझ्याविरुध्द कोणत्याही फौजदारी न्यायालयात खटला प्रलंबित नाही.

दिनांक :
ठिकाण:

अर्जदाराची स्वाक्षरी
(नाव व पत्ता)